[इंग्रजी टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद]

[२०२२] १७ एस.सी.आर. [६८१- ६९५]

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ

विरुद्ध

प्रादेशिक संचालक कर्मचारी राज्य विमा महामंडळ आणि इतर

(विशेष अनुमती याचिका (सी) क्रमांक १३५५४-१३५५५ / २०२२)

ऑगस्ट १८, २०२२

[न्या. आर. शहा आणि न्या. पी. एस. नरसिंह]

कर्मचारी राज्य विमा कायदा, १९४८ - ई एस आय कायद्याच्या उद्देशाने, बी सी सी आय "दुकान" असेल तर - असे ठरवण्यात आले : ई एस आय कायद्यातील तरतुदी लागू होतात त्या उद्देशाने बी सी सी आय ला "दुकान" म्हणता येईल - बी सी सी आय द्वारे केल्या जाणाऱ्या एकूण पद्धतशीर उपक्रमांचा विचार करता, म्हणजेच क्रिकेट सामन्यांच्या तिकिटांची विक्री; करमणूक करणे; पैशाच्या मोबदल्यात सेवा पुरवणे इत्यादी, ई एस आय कोर्ट तसेच उच्च न्यायालयाने योग्य निष्कर्ष काढला की, बी सी सी आय पद्धतशीर आर्थिक व्यावसायिक उपक्रम राबवित आहे आणि म्हणूनच, ई एस आय

कायद्यातील तरतुदी लागू होण्याच्या हेतूने ते "दुकान" म्हणता येईल - रेकॉर्डवरील सामग्रीचे विश्लेषण केल्यानंतर ई एस आय कोर्ट आणि उच्च न्यायालयाने बी सी सी आय ही नफा कमावणारी संस्था आहे आणि ती करमणूक क्षेत्रात कार्यरत आहे असा निष्कर्ष नोंदविला कारण ती संस्था मोबदला घेऊन करमणूक सेवा देते म्हणजेच तिकीट विकून करमणूक सेवा देते आणि म्हणून त्यांनी त्यांच्या संरक्षण मिळण्यास पात्र कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या वेतनावर, ई एस आय योगदानाचा लाभ दिला पाहिजे - नोंदवलेले निष्कर्ष पुराव्यांच्या मूल्यमापनावर आहेत आणि म्हणूनच कलम १३६ अंतर्गत अधिकारांचा वापर करून हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नाही - ई एस आय कायद्याच्या अंमलबजावणीच्या उद्देशाने, बी सी सी आय ला "दुकान" मानताना, उच्च न्यायालयाने बी सी सी आय च्या मेमोरेंडम ऑफ असोसिएशनच्या संबंधित कलमांचाही विचार केला आहे - संपूर्ण मेमोरेंडम ऑफ असोसिएशनचा विचार करणे आवश्यक आहे - शिवाय, ई एस आय कायदा एक लाभ मिळवून देण्यासाठी बनवलेला कायदा आहे, त्याच्या अंमलबजावणीचा उद्देश आणि हेतू साध्य करण्यासाठी व्यापक अर्थ दिला गेला पाहिजे, उदाहरण सांगायचं झालं तर आजारी पडल्यास कर्मचाऱ्यांना काही लाभ देणे, महिला कर्मचाऱ्याच्या बाबतीत प्रसूती साठी, कामावर हजर असताना इजा झाल्यास इ. - उच्च न्यायालय तसेच ई एस आय न्यायालयाने दिलेल्या वादग्रस्त आदेशात हस्तक्षेप करण्याचे कारण नाही – भारतीय राज्यघटना – कलम १३६.

कर्मचारी राज्य विमा अधिनियम, १९४८ - लागू करणे बाबत – चर्चा केली.

कायद्यांचे विवेचन – असे मानले गेले की : दोन कायदे जेव्हा एकाच विषयाशी संबंधित असतात तेव्हा त्यांना एकमेका बरोबर पॅरी मटेरिया (pari materia) असतात असे म्हणतात - विशिष्ट कायद्यात वापरलेल्या शब्दाचा अर्थ, दुसऱ्या कायद्यात त्याच अर्थाने अनुवाद करून वापरला जाऊ शकत नाही, विशेषत: हे लक्षात घेता की दोन्ही कायदे एकमेकाबरोबर पॅरी मटेरिया नाहीत आणि त्यांची एकमेकांपासून पूर्णपणे वेगळी योजना आहे.

बेंगळुरू टर्फ क्लब लिमिटेड विरुद्ध प्रादेशिक संचालक , कर्मचारी राज्य विमा महामंडळ. **२०१४ (९) एस सी सी ६५७ : [२०१४] ८ एस सी आर १०२१ - अवलंबून आहे.**

माहिती व प्रसारण मंत्रालयाचे सचिव, भारत सरकार आणि इतर विरुद्ध बंगाल क्रिकेट असोसिएशन आणि इतर. **(१९९५) २ एस सी सी १६१ : [१९९५] १ एस सी आर १०३६;** विक्रीकर आयुक्त विरुद्ध साई प्रकाशन निधी **(२००२) ४ एस सी सी ५७ : [२००२] २ एस सी आर ७४३ - लागू नाही असे मानले गेले.**

प्रादेशिक संचालक, ई.एस.आय कॉर्पोरेशन विरुद्ध फ्रान्सिस डी कोस्टा **१९९३ पु. (४) एस सी सी १०० : [१९९२] ३ एस सी आर २३**; ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन ऑफ

इंडिया विरुद्ध एम्प्लॉइज स्टेट इन्शुरन्स कॉर्पोरेशन आणि इतर **(२०००) १ एस सी सी ३३२: [१९९९] ४ पु. एस सी आर ३९३;** बकिंगहॅम अँड कर्नाटक कंपनी लि.विरुद्ध वेंकटय्या **[ए आय आर १९६४ एस सी १२७२] : [१९६४] एस सी आर २६५;** बॉम्बे आनंद भवन रेस्टॉरंट विरुद्ध उपसंचालक, कर्मचारी राज्य विमा महामंडळ **(२००९) ९ एस सी सी ६१ : [२००९] १३ एस सी आर ११३९ - संदर्भित.**

केस लॉ संदर्भ

[२०१४] ८ एससीआर १०२१	**परिच्छेद २.२**	**यावर अवलंबून होते**
[१९९५] १ एससीआर १०३६	**परिच्छेद ४.१**	**लागू नाही**
[२००२] २ एससीआर ७४३	**परिच्छेद ४.१**	**लागू नाही**
[१९९२] ३ एससीआर २३	**परिच्छेद ८.१**	**संदर्भित**
[१९९९] ४ एससीआर ३९३	**परिच्छेद ८.१**	**संदर्भित**
[१९६४] एससीआर २६५	**परिच्छेद ८.१**	**संदर्भित**
[२००९] १३ एससीआर ११३९	**परिच्छेद ८.१**	**संदर्भित**

दिवाणी अपिलीय अधीरकरिता क्षेत्र

विशेष अनुमती याचिका (सी) क्रमांक १३५५४-१३५५५ / २०२२

मुंबई उच्च न्यायालयाच्या दिनांक २४.०६.२०२२ च्या प्रथम अपील स्टॅम्प क्रमांक २५९८० / २०२१ आणि त्या सोबत अंतरिम अर्ज क्रमांक १०२६ / २०२२ जो प्रथम अपील क्रमांक २५९८० / २०२१ मधील आहे त्या निकाल आणि आदेशातून उद्भवलेले.

नीरज किशन कौल, वरिष्ठ वकील अभिनव मुकर्जी, कनू अग्रवाल, श्रीमती बिहू शर्मा, सुश्री प्रतिष्ठा वीज, अक्षय सी श्रीवास्तव, ध्रुव शर्मा, राघव अग्रवाल, याचिका कर्त्यातर्फे वकील.

मनीष कुमार सरन, सत्य पी शरन, उत्तरवादीकडून वकील.

न्यायालयाचा हा आदेश न्यायमूर्ती **एम आर शाह** यांनी पारित केला.

१. अपीलकर्त्याने (भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने यांनतर बी सी सी आय असा उल्लेख केला आहे) दाखल केलेल्या प्रथम अपील स्टॅम्प क्रमांक २५९८० / २०२१ मधील मुंबई उच्च न्यायालयाच्या दिनांक २४.०६.२०२२ च्या आक्षेपित निर्णयामुळे नाराज आणि असमाधानी वाटल्यामुळे, सध्या हातात असलेली विशेष अनुमती याचिका

दाखल केली आहे, ज्या दिनांक २४.०६.२०२२ च्या निर्णया द्वारे उच्च न्यायालयाने अपील फेटाळून लावले, ते अपील, कर्मचारी विमा न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक ०९.०९.२०२१ च्या निर्णय आणि आदेशाविरुद्ध दाखल केले होते , ज्या दिनांक ०९.०९.२०२१ च्या निर्णया द्वारे असे घोषित केले की कर्मचारी राज्य विमा कायदा, १९४८ च्या कलम १(५) च्या तरतुदी नुसार (यापुढे "इ एस आय कायदा" म्हणून उल्लेखले आहे), महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या दिनांक १८.०८.१९७८ च्या अधिसूचने प्रमाणे, बी सी सी आय हे "दुकान" या व्याख्येत समाविष्ठ होते आणि प्रकरण बी सी सी आय साठी योगदान निश्चित होण्यासाठी पाठवले होते.

२. कर्मचारी राज्य विमा महामंडळ, मुंबई च्या प्रादेशिक संचालकांनी दिनांक २२.०६.२०११ रोजी जारी केलेल्या पत्राद्वारे असे कळविण्यात आले की बी सी सी आय दिनांक ०१.०१.२००७ पासून ई एस आय कायद्यातील तरतुदींच्या अंतर्गत समाविष्ट आहे आणि बी सी सी आय ला, ई एस आय कायद्यातील तरतुदी लागू आहेत हे दर्शविणारा कोड नंबर देण्यात आला आहे. ई एस आय कायद्यातील तरतुदींच्या अधीन राहून मे, २००७ ते मार्च २०१४ या कालावधीसाठी कर्मचारी राज्य विमा अंशदान म्हणून ५,०४,०७५/- रुपयांच्या योगदानाचा दावा करणारी नोटीस बी सी सी आय ला दिनांक ०१.०७.२०१४ रोजी प्रोफॉर्मा सी-१८ मध्ये कळविण्यात आली होती. ई एस आय कायद्यातील तरतुदी बी सी सी आय ला लागू करणे हे ई एस आय कायद्याच्या कलम २ए

आणि कर्मचारी राज्य विमा (सामान्य) नियम १९५० च्या नियम १० बी चे उल्लंघन आहे, कारण बी सी सी आय चा मुख्य उद्देश देशभरात क्रिकेट खेळाचे प्रशासन, प्रचार आणि नियंत्रण करणे आहे, त्यामुळे मुंबई दुकाने आणि आस्थापना कायदामधील तरतुदींनुसार हे दुकान 'शॉप' म्हणून समाविष्ट किंवा नोंदणीकृत नाही, या कारणास्तव बी सी सी आयने त्यास विरोध केला. बी सी सी आय च्या वतीने असेही म्हटले गेले होते की ते प्रामुख्याने कोणत्याही प्रकारचे व्यापारी किंवा व्यावसायिक उपक्रम यात सहभागी नाहीत आणि म्हणूनच, बी सी सी आय, ई एस आय कायद्याच्या कलम १ (५) च्या अर्थाच्या कक्षेत येत नाही.

२.१. ई एस आय कायद्याच्या कलम ४५अ अन्वये दिलेल्या आदेशाविरोधात कर्मचारी राज्य विमा न्यायालय, मुंबई (पुढे "ई एस आय कोर्ट" म्हणून उल्लेख केला आहे) येथे अपील दाखल करण्यात आले, ज्यांनी जून २०१० ते मार्च २०१४ या कालावधीसाठी योगदानाची रक्कम रु.४,९३,३५०/- नक्की केली. तपशीलवार निर्णय आणि ऑर्डरद्वारे आणि त्याच्यासमोर सादर केलेल्या विविध कागद पत्रे आणि त्याचबरोबर बी सी सी आय चे मेमोरँडम ऑफ असोसिएशन, नियम, त्यांचे वार्षिक अहवाल हे विचारात घेऊन ई एस आय न्यायालयाने निष्कर्ष काढला की बी सी सी आय चे उपक्रम हे पूर्णपणे व्यावसायिक उपक्रम असल्याचे म्हटले आहेत आणि म्हणून, ई एस आय कायद्याच्या तरतुदी बी सी सी आय ला लागू होतील. ई एस आय

न्यायालयाद्वारे दिलेला निकाल आणि आदेश, हा उच्च न्यायालयासमोरील प्रथम अपीलचा विषय होता.

२.२. रेकॉर्डवरील संपूर्ण पुराव्यांचे मूल्यमापन केल्यावर, बी सी सी आय चालवत असलेले उपक्रम आणि मेमोरँडम ऑफ असोसिएशनची संबंधित परिच्छेद पाहता आणि **बेंगळुरू टर्फ क्लब लिमिटेड विरुद्ध प्रादेशिक संचालक , कर्मचारी राज्य विमा महामंडळ २०१४ (९) एस सी सी ६५७**, या खटल्यातील निर्णय विचारात घेता, ई एस आय न्यायालयाने नोंदवलेल्या निष्कर्षांशी उच्च न्यायालयाने सहमती दर्शविली आहे की दिनांक १८.०९.१९७८ च्या अधिसूचनेनुसार बी सी सी आय ला "दुकान" म्हणता येईल आणि म्हणूनच, ई एस आय कायद्यातील तरतुदी लागू केल्या आणि विशेष निरीक्षण केले आणि असे मानले की बी सी सी आय चे उपक्रम हे "दुकान" च्या व्याख्येच्या उद्देशाने आणि ई एस आय कायद्यातील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी, व्यावसायिक उपक्रम आहेत असे म्हणता येईल. परिणामी, या वादग्रस्त निकालाने आणि आदेशाने उच्च न्यायालयाने सध्याचे विशेष अनुमती याचिकांचा विषय असलेले पहिले अपील फेटाळून लावले.

३. श्री नीरज किशन कौल, विद्वान वरिष्ठ वकील याचिकाकर्ते - बी सी सी आय च्या वतीने हजर झाले आणि श्री मनीष कुमार सरन, विद्वान वकील उत्तरवादीं - इ एस आय महामंडळ यांच्या वतीने हजर झाले.

४. याचिकाकर्ते - बी सी सी आय च्या वतीने बाजू मांडणारे विद्वान वरिष्ठ वकील श्री नीरज किशन कौल यांनी उच्च न्यायालय आणि इ एस आय कोर्ट यांच्यासमोर मांडलेले मुद्दे पुन्हा मांडले. बी सी सी आय यांच्या तर्फे चालवले जाणारे उपक्रम हे दिनांक १८.०९.१९७८ च्या अधिसूचने प्रमाणे, दुकान या व्याख्येखाली आणण्यासाठी, व्यावसायिक उपक्रम ठरू शकत नाहीत, असा त्यांनी जोरदार युक्तिवाद केला. बी सी सी आय ने कमावलेला महसूल हा शेवटी खेळाला - क्रिकेटला प्रोत्साहन देण्यासाठी वापरला जाणार म्हणून बी सी सी आय ला दुकान म्हणता येणार नाही असाही मुद्दा त्यांनी मांडला आणि म्हणून ई एस आय कायद्यातील तरतुदी लागू होणार नाहीत. मेमोरँडम ऑफ असोसिएशनच्या परिच्छेद २ आणि ३ चा आधार मोठ्या प्रमाणात घेतला आहे.

४.१ याचिकाकर्ते - बी सी सी आय च्या वतीने बाजू मांडणारे विद्वान वरिष्ठ वकील, श्री कौल यांनी पुढे असे म्हटले आहे की एखाद्या विशिष्ट संस्थेला "दुकान" च्या व्याख्येत आणण्यासाठी आणि अशा संस्थेच्या उपक्रमांना व्यावसायिक उपक्रम म्हणता येईल का याचा विचार करताना, अशा संस्थेच्या प्रमुख उपक्रमांचा विचार केला पाहिजे. बी सी सी आय चा विचार केला तर क्रिकेटला प्रोत्साहन देणे हा प्राथमिक आणि प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे जर बी सी सी आय च्या प्रमुख कामकाजाचा विचार केला तर अशा परिस्थितीत बी सी सी आय "दुकान" या व्याख्येत येणार नाही आणि त्यामुळे ई एस आय कायद्यातील तरतुदी लागू होणार नाहीत. बी सी सी आय च्या वतीने ज्येष्ठ वकील कौल

यांनी त्यांच्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ, **सचिव, माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार आणि इतर विरुद्ध बंगाल क्रिकेट असोसिएशन आणि इतर, (१९९५) २ एस सी सी १६१** त्याचप्रमाणे त्यानंतरचा निर्णय **विक्रीकर आयुक्त विरुद्ध साई प्रकाशन निधी, (२००२) ४ एस सी सी ५७** (परिच्छेद १०, ११, १३ आणि १७) या दोन खटल्यातील निर्णयाचा आधार घेत असा मुद्दा मांडला की दिनांक १८.०९.१९७८ च्या अधिसूचनेनुसार बी सी सी आय ला "दुकान" म्हणता येणार नाही आणि ई एस आय कायद्यातील तरतुदी लागू होणार नाहीत.

५. सध्याच्या विशेष अनुमती याचिकांना विरोध करताना, उत्तरवादीं - इ एस आय महामंडळ यांच्या वतीने बाजू मांडणारे विद्वान वकील श्री मनीष कुमार सरन यांनी ई एस आय कोर्ट तसेच उच्च न्यायालयाने नोंदविलेल्या विशिष्ट निष्कर्षांकडे लक्ष वेधले आहे की बी सी सी आय ला "दुकान" व्याख्येत आणण्यासाठी बी सी सी आय च्या कामकाजाला व्यावसायिक कामकाज (उपक्रम) म्हणता येईल असे म्हटले आहे. ई एस आय न्यायालय आणि उच्च न्यायालयाने नोंदवलेले निष्कर्ष रेकॉर्डवरील पुरावे / सामग्रीचे मूल्यांकन आणि मेमोरेंडम ऑफ असोसिएशनच्या परिच्छेद (ई) (एफ), (के), (एम), (एन), (ओ), (पी), (आर), (एस) यांचा विचार करून नोंदवले आहेत. त्यांनी असे निवेदन केले की रेकॉर्डवरील सामग्रीचा आणि तसेच बी सी सी आय च्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या जबाबाचा विचार केल्यानंतर, ई एस आय न्यायालयाने असे

विशेष निरीक्षण आणि मत नोंदवले आहे की बी सी सी आय ही मनोरंजन आणि/किंवा पद्धतशीर व्यावसायिक उपक्रम राबविणारी संस्था आहे आणि कार्यक्रमांचे आयोजन करून, मनोरंजनाचे साधन म्हणून क्रिकेटला प्रोत्साहन देऊन आणि त्याद्वारे निधी गोळा करून जनतेला सार्वजनिक सेवा पुरविण्यात गुंतलेली आहे.

५.१ ई एस आय महामंडळ यांच्या वतीने उपस्थित विद्वान वकिलांनी पुढे असे म्हटले आहे की, ई एस आय कायदा हा कल्याणकारी कायदा आहे आणि म्हणूनच, **बेंगळुरू टर्फ क्लब लिमिटेड** (सुप्रा) (उपरोल्लेखित) च्या बाबतीत या न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार, "दुकान" या शब्दाला उदारपूर्वक अर्थ देण्यात यावा. त्यांनी असे म्हणणे मांडले की वरील प्रकरणात या न्यायालयाने असे म्हटले आहे की ई एस आय कायदा काही फायदे प्रदान करण्यासाठी पारित केला गेला आहे, कर्मचारी आजारपण, महिला कर्मचाऱ्यांच्या बाबतीत प्रसूती आणि नोकरी दरम्यान इजा झाल्यास ई एस आय कायद्याचा उदार आणि लाभदायी या दृष्टिने विचार घेतला गेला पाहिजे जेणेकरून कायद्यातील हेतू साध्य होईल.

५.२ आता **साई प्रकाशन निधीच्या** (सुप्रा) बाबतीत या न्यायालयाच्या निर्णयावर विसंबून राहून याचिका कर्ते - बी सी सी आय च्या वतीने विद्वान वकील यांनी मांडलेल्या बाजू बाबत विचार करायचा झाला तर, ई एस आय कॉर्पोरेशनच्या वतीने उपस्थित विद्वान वकिलांनी ठामपणे सांगितले आहे की ई एस आय कायद्यातील तरतुदींचा विचार

करताना हा निर्णय लागू होणार नाही कारण या प्रकरणातील निर्णय आयकर कायद्याशी संबंधित आहे. त्यांनी असे निवेदन केले की **बंगळुरू टर्फ क्लब लिमिटेड** (सुप्रा) या खटल्यात निरीक्षण केल्याप्रमाणे - एखाद्या विशिष्ट कायद्यात वापरल्या गेलेल्या शब्दांचा अर्थ, दुसऱ्या कायद्यात त्याच अर्थाने अनुवाद करून वापरला जाऊ शकत नाही, विशेषत: हे विचारात घेता की जेव्हा दोन्ही कायदे एकमेकांशी पूरक नाहीत आणि एकमेकांपासून पूर्णपणे वेगळ्या विचारातून बनले आहेत. याउलट **बेंगळुरू टर्फ क्लब लिमिटेड** (सुप्रा)च्या बाबतीत या न्यायालयाचा निर्णय, जे ई एस आय कायद्यातील तरतुदींशी निगडित आहे ते पूर्ण ताकदीनिशी लागू होईल.

५.३ वरील युक्तिवाद करताना आणि **बेंगळुरू टर्फ क्लब लिमिटेड** (सुप्रा) च्या बाबतीत या न्यायालयाच्या निर्णयावर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहून, सध्याची विशेष अनुमती याचिका फेटाळण्याची विनंती केली.

६. संबंधित पक्षकारांच्या वतीने बाजू मांडणाऱ्या विद्वान वकिलांचे सविस्तर म्हणणे ऐकून घेतले.

७. या न्यायालयाच्या विचारार्थ उपस्थित केलेला संक्षिप्त प्रश्न आहे:-

“१८.०९.१९७८ च्या अधिसूचनेनुसार बी सी सी आय ला "दुकान" म्हणता येईल का आणि त्यामुळे ई एस आय कायद्यातील तरतुदी बी सी सी आय ला लागू

होतील की नाही?"

८. उपरोक्त मुद्दा/प्रश्न विचारात घेताना, **बेंगळुरू टर्फ क्लब लिमिटेड** (सुप्रा) च्या बाबतीत या न्यायालयाचा थेट निर्णय, जो या समस्येशी निगडित आहे आणि ई एस आय कायद्याची अंमलबजावणी हाताळत आहे, त्याचा संदर्भ घेणे आणि विचार करणे आवश्यक आहे.

८.१ **बेंगळुरू टर्फ क्लब लिमिटेड** (सुप्रा) च्या बाबतीत, या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले आणि असे म्हटले की ई एस आय कायदा हा कामगारांसाठी आरोग्य विम्याच्या योजनेच्या तातडीच्या गरजेतून केंद्र सरकारने लागू केलेला कल्याणकारी कायदा आहे आणि म्हणूनच, ज्यांना विधिमंडळाच्या हेतूनुसार लाभ मिळणे आवश्यक आहे, त्या कामगारांना लाभ मिळावा हे साध्य होण्यासाठी उदार मत अवलंबून अर्थ लावला गेला पाहिजे. परिच्छेद १७ मध्ये, या न्यायालयाने ई एस आय कायदा लागू करण्याचा उद्देश आणि हेतू विचारात घेतला आहे आणि परिच्छेद १८ ते २० मध्ये या न्यायालयाच्या खालील प्रकरणात आधीच्या निर्णयांचा विचार केला, **प्रादेशिक संचालक, ई. एस. आय. महामंडळ कॉर्पोरेशन विरुद्ध फ्रान्सिस डी कोस्टा, १९९३ पु. (४) एस सी सी १०० ; ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया विरुद्ध एम्प्लॉइज स्टेट इन्शुरन्स कॉर्पोरेशन आणि इतर, (२०००) १ एस सी सी ३३२; बकिंगहॅम अँड कर्नाटक कंपनी लिमिटेड विरुद्ध वेंकटय्या [एआयआर १९६४ एस सी १२७२] आणि बॉम्बे आनंद भवन रेस्टॉरंट**

विरुद्ध उपसंचालक, कर्मचारी राज्य विमा महामंडळ, (२००९) ९ एस सी सी ६१, वरील निर्णयांमध्ये केलेली संबंधित निरीक्षणे खालीलप्रमाणे आहेत:-

"१८. ई एस आय महामंडळ विरुद्ध फ्रान्सिस डी कोस्टा [१९९३ पु. (४) एस सी सी १००] या खटल्यात या न्यायालयाने खालीलप्रमाणे म्हटले आहे की: (एस सी सी पृष्ठ १०५-०६, परिच्छेद ५-६)

"५. या कायद्यात आजारपण, प्रसूती, कर्तव्य करताना झालेली इजा किंवा कर्तव्य करताना त्यातून उद्भवलेला आजार इत्यादींचा समावेश आहे. हा कायदा सामाजिक सुरक्षेचा कायदा आहे. अन्याय रोखण्यासाठी किंवा न्यायाला चालना देण्यासाठी आणि कल्याणकारी कायद्याचा उद्देश आणि हेतू प्रभावी करण्यासाठी, वेळ पडल्यास शब्दशः अर्थापासून फारकत घेत व्यापक अर्थ लावून विवेचन केले पाहिजे असा प्रस्थापित कायदा आहे. न्यायालयाने मार्गदर्शक कलम ३८ व ३९ यातून प्रेरणा घेऊन आणि घटनेच्या प्रस्तावनेत अपेक्षित असलेला आर्थिक व सामाजिक न्याय द्यावा ज्यामुळे कलम २१ अन्वये कामगाराच्या जगण्याचा अर्थपूर्ण अधिकार प्राप्त होईल. कलम ३९ (ई) अन्वये कामगारांच्या आरोग्याचे रक्षण करणे, कलम ४१ अन्वये आजारपणा पासून सुरक्षित ठेवणे आणि अपंगत्वाचे लाभ आणि कलम ४३ अन्वये चांगले जीवनमान प्रदान करण्यास सरकार कटिबद्ध आहे. मानवी

हक्कांच्या सार्वत्रिक घोषणेच्या कलम २५ (२) आणि आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांवरील आंतरराष्ट्रीय कराराच्या कलम ७ (ब) अन्वये वैद्यकीय आणि अपंगत्वाच्या लाभांचा अधिकार हा मूलभूत मानवी हक्क आहे. आरोग्याचा अधिकार, एक मूलभूत मानवी हक्क हा आपल्या संविधान आणि सार्वत्रिक न्याय मानवी हक्कांची घोषणा यात सामाजिक आर्थिक न्याय म्हणून नमूद केला आहे. त्याच बरोबर कामगाराला वैद्यकीय लाभ मिळणे हा त्याचा/तिचा मूलभूत अधिकार आहे. कायदा विमाधारकाच्या आरोग्याच्या देखभालीसाठी मदत करण्याचा प्रयत्न करतो. वरील गोष्टी परिणामकारक होण्यासाठी व्याख्यात्मक प्रयत्न हवेत. अशा प्रकारे, वैद्यकीय लाभाचा अधिकार हा कामगाराचा मूलभूत अधिकार आहे.

६. शिवाय, कायद्यांच्या अनुवादाच्या क्षेत्रात, कायद्याचे राज्य ही विस्तार आणि परिपूर्णतेची एक गतिशील संकल्पना आहे ज्यासाठी अर्थ असा काढला जावा जो अर्थ राज्यघटनेत कल्पना केलेल्या सामाजिक आणि आर्थिक न्यायाची कल्पना पूर्ण करेल. कायदा हा परिवर्तनाच्या प्रक्रियेत सामाजिक दिशा म्हणून जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न आहे. सामान्य समाजजीवनाच्या संदर्भात कायद्याचे आत्मपरीक्षण झाले तरच कायदा आणि सामाजिक बदल यांचा मेळ साधता येईल. कायद्याचे जीवन हा निव्वळ तर्क नसून अनुभव आहे. हे सामाजिक हेतू आणि जाणवलेल्या गरजा पूर्ण करण्याचे साधन आहे.

ताणतणाव, अपंगत्व, इजा इ. वेळी कामगाराला वैधानिक संरक्षण व मदतीची गरज असते. हा कायदा विमाधारक रोजगारामध्ये, नियोक्ता आणि कर्मचाऱ्यावर कायद्यानुसार स्थापन केलेल्या कल्याण निधीमध्ये विहित प्रमाणात आणि विहित पद्धतीने योगदान देण्याचे वैधानिक बंधन घालतो (कायद्याची कलम ३८ ते ५१ पर्यंत) कामगारांना त्यांच्या गरजेच्या वेळी, उदरनिर्वाहाची साधने पुरवणे, विशेषत: जेव्हा त्यांच्या रोजगाराच्या कारणास्तव निष्क्रियता किंवा अपंगत्व किंवा नोकरीमध्ये असताना मृत्यू झाल्यामुळे, ते आर्थिकदृष्ट्या कमकुवत बनतात. कर्मचाऱ्याने आपल्या कष्टाने कमावलेल्या वेतनातून निधीत योगदान दिले हे एखाद्या कर्मचाऱ्याला झालेली इजा किंवा व्यावसायिक आजार ही रोजगारादरम्यानची इजा आहे की नाही हे ठरविण्यात महत्त्वपूर्ण परिणाम करू शकतात. ही जबाबदारी कोणत्याही करारावर किंवा नियोक्त्याने केलेल्या कोणत्याही कृत्यावर किंवा चुकीवर आधारित नसते तर नियोक्ता रोजगाराशी असलेल्या नात्याच्या अस्तित्वावर आधारित असते ज्यादरम्यान कर्मचारी जखमी झाला होता. हा कायदा चुकीच्या आधारवर नाही तर समाजकल्याणाचा एक पैलू म्हणून, एखाद्या शारीरिकदृष्ट्या किव्वा आर्थिक दृष्ट्या अपंग कामगाराचे ज्यावर आजारपण इजा यामुळे विपरीत परिणाम झाला आहे किव्वा एखाद्या कामगाराच्या मृत्यूमुळे त्या कामगारावर अवलंबून असलेल्यांची उपजीविका यावर विपरीत परिणाम झाला आहे, अशांचे पुनर्वसन करतो व अशाप्रकारे कायद्यातील कारवाईची जागा घेतो.

१९. ई एस आय कायद्या संदर्भात या न्यायालयाचे तीन न्यायाधीशांचे खंडपीठाने, ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया विरुद्ध ई एस आय कॉर्पोरेशन. [(२०००) १ एस सी सी ३३२], असे मानले की : (एस सी सी पृ. ३५७-५८, परिच्छेद २७-२८)

> २७. या मुद्द्यावरील चर्चा संपवताना शेवटी हे ठळक तथ्य लक्षात घेणे आवश्यक आहे की, विधिमंडळाने बनवलेला हा कायदा कर्मचाऱ्यांना आजारपण, प्रसूती, रोजगारा दरम्यानची इजा आणि त्याअनुषंगाने इतर काही बाबींसाठी लाभ देण्याच्या उद्देशाने कल्याणकारी कायदा आहे. सामाजिक कल्याण सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने आणि नोकरीदरम्यान विविध शारीरिक आजारांनी ग्रस्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुरक्षित विमा संरक्षण प्रदान करण्याच्या दृष्टीने हा कायदा करण्यात आला आहे. अशा प्रकारच्या कल्याणकारी कायद्याचा अर्थ लावताना योग्य दृष्टिकोनातून लावायला हवा जेणे करून कायदा बनवण्यामागचा विधिमंडळाचे उद्देश फलदायी ठरेल. जेव्हा विशिष्ठ कर्मचाऱ्यांच्या बाबतीत लागू करण्यासाठी दोन भिन्न अर्थ निघत असतील तेव्हा जो विधिमंडळाने अपेक्षित केलेला उद्देश लागू होईल असा मार्ग निवडावा, जो मार्ग निष्फळ ठरवेल असा नाही.
>
> २८. याच कायद्याचा विषय हाताळताना बकिंगहॅम आणि कर्नाटक कंपनी लि. विरुद्ध व्यंकटय्या [ए आय आर १९६४ एससी १२७२] या खटल्यात या

न्यायालयाचे तीन न्यायाधीशांचे खंडपीठाने, न्यायमूर्ती गजेंद्रगडकर, (कारण ते त्यावेळी होते) यांच्यामार्फत बोलताना विद्वान वकील श्री डोलिया यांचा युक्तिवाद मान्य केला, की : (ए. आय. आर. पृ. १२७७, परिच्छेद १०)

> १०. .... ज्या कामगारांना तो लागू होते त्यांना विशिष्ट लाभ देण्याचा हेतू असलेला हा सामाजिक कायद्याचा एक खंड आहे आणि म्हणूनच, संबंधित तरतुदींचा तांत्रिक किंवा संकुचित अर्थ लावण्याचा प्रयत्न करणे अयोग्य ठरेल. या भूमिकेबाबत वाद नाही. पण डोलिया यांनी या कलमाचा उदारअर्थ लावावा, अशी केलेली विनंती हाताळताना उदारमतवादी रचना शेवटी या कलमात वापरलेल्या शब्दांमधूनच प्रवाहित झाली पाहिजे, ही वस्तुस्थिती आपण दुर्लक्षित करू शकत नाही. जर कलमात वापरलेले शब्द दोन वेगळे अर्थ निघण्यास सक्षम असतील, त्यापैकी एक अर्थ कायद्याचे उद्दिष्ट साध्य करण्यास मदत करण्यासाठी स्पष्टपणे दिसत असेल, तर न्यायालयांनी अशा अर्थाला प्राधान्य देणे योग्य ठरेल दुसऱ्या अर्थापेक्षा जे कायद्याचा उद्देश साध्य करण्यास सक्षम नसतील.

२०. बॉम्बे आनंद भवन रेस्टॉरंट विरुद्ध ई एस आय कॉर्पोरेशन. [(२००९) बी ९ एस सी सी ६१], या प्रकरणात असे निदर्शनास आले की: (एस सी सी पृ. ६६,

पॅरा २०)

"२०. कर्मचारी राज्य विमा कायदा हा कल्याणकारी कायदा आहे. प्रस्तावनेनुसार या कायद्याचा मुख्य हेतू कारखान्यातील कर्मचाऱ्यांना आजारपण, प्रसूती आणि कामाच्या दरम्यान ची इजा झाल्यास काही फायदे प्रदान करणे आणि त्याअनुषंगाने इतर काही बाबींसाठी तरतूद करणे हा आहे. कर्मचारी राज्य विमा कायदा हा एक सामाजिक सुरक्षा कायदा आहे आणि एखाद्या सामाजिक कायद्याचा अर्थ लावण्याचे नियम हे कर कायद्याच्या नियमापेक्षा भिन्न आहेत. सामाजिक कायद्यातील तरतुदींचा भंग होईल अशा कोणत्याही पळवाट किव्वा सबबीला पाठबळ मिळेल असे धोरण न्यायालयांनी स्वीकारू नये आणि विधिमंडळाने हा कायदा तयार करून कायद्याचे पुस्तक बनवण्या मागे जो अपेक्षित उद्देश आहे तो साध्य करण्यासाठी, गरज पडल्यास, न्यायालयांनी कायद्याच्या भाषेवर ताण दिला पाहिजे. या कायद्याला उदार स्वरूप प्राप्त झाले पाहिजे, जेणेकरून त्याच्या उद्दिष्टांना चालना मिळेल."

८.१.१. त्यानंतर परिच्छेद २१ मध्ये खालीलप्रमाणे निरीक्षण केले आहे व खालीलप्रमाणे मानले आहे :-

"२१. कर्मचाऱ्यांना आजारपण, महिला कर्मचाऱ्यांच्या बाबतीत प्रसूती, नोकरी

दरम्यान इजा झाल्यास काही लाभ देण्यासाठी आणि त्यासंबंधित काही इतर तरतुदी करण्यासाठी विधिमंडळाने ई एस आय कायदा केला. हंगामी कारखाने वगळता इतर सर्व कारखान्यांना ई एस आय कायद्यातील तरतुदी लागू आहेत. ई एस आय कायद्यातील तरतुदी इतर कोणत्याही आस्थापना किंवा आस्थापनांना लागू करण्याचा अधिकार केंद्र सरकारच्या मान्यतेने राज्य सरकारला आहे. ई एस आय कायद्यातील तरतुदीनुसार ई एस आय कायदा लागू असलेल्या कारखाने किंवा आस्थापनांमधील सर्व कर्मचाऱ्यांचा ई एस आय कायद्यांतर्गत दिलेल्या पद्धतीने विमा उतरविला जाईल. ई एस आय कायदा कर्मचाऱ्यांना आजारपण, प्रसूती आणि नोकरी दरम्यान इजा झाल्यास काही लाभ देण्यासाठी पारित करण्यात आला आहे, त्यामुळे ई एस आय कायद्याला उदार आणि कल्याणकारी अर्थ मिळणे आवश्यक आहे जेणेकरून कायद्याच्या भाषेवर जुलूम न करता कायदेशीर हेतू साध्य होईल.

८.१.२ त्यानंतर "आस्थापना" व "दुकान" या शब्दांचा अर्थ लावताना परिच्छेद ३७, ३८.६ व ३९ ते ४२ मध्ये खालीलप्रमाणे निरीक्षण केले आहे :-

"३७. "आस्थापना" या शब्दाचा अर्थ असा आहे की कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा व्यवसाय किंवा त्याच्याशी संबंधित किंवा प्रासंगिक किंवा अनुषंगिक कार्य करण्यासाठी जागा. शब्दकोशातील व्याख्या ही व्यापार किंवा वाणिज्याची

पारंपारिक व्याख्या आहे हे खरे आहे, परंतु आधुनिक कल्याणकारी राज्यात समाजकल्याण कायदा तयार करण्याच्या हेतूने ती पूर्णपणे वैध असू शकत नाही. व्यावसायिक उपक्रम "आस्थापना" या शब्दाच्या अर्थात मोडतात की नाही हे शोधण्याची चाचणी म्हणजे अशा उपक्रमात व्यापार किंवा व्यवसायाच्या पद्धतीने कर्मचाऱ्यांच्या मदतीने समाजाला वस्तू किंवा सेवांचे उत्पादन किंवा वितरण करण्यासाठी उपक्रम पद्धतशीरपणे आणि नियमितपणे केला जातो की नाही. जागेत पद्धतशीर आर्थिक किंवा व्यावसायिक उपक्रम राबविला जात असेल, तर ज्या आस्थापनात असा उपक्रम चालतो, ते 'दुकान' असते. हैदराबाद रेस क्लब प्रकरणात [ई एस आय महामंडळ विरुद्ध हैदराबाद रेस क्लब, (२००४) ६ एस सी सी १९१] या न्यायालयाने क्लबने चालविलेल्या पद्धतशीर व्यावसायिक उपक्रमाना लक्षात घेऊन ई एस आय कायद्याच्या कलम १ (५) अन्वये जारी केलेल्या अधिसूचनेत वापरलेल्या या अभिव्यक्तीच्या अर्थांतर्गत रेस क्लब ही आस्थापना असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे आमच्या मते या न्यायालयाने व्यक्त केलेले मत ई एस आय कायद्यातील तरतुदींशी आणि प्रस्थापित कायदेशीर तत्वांशी सुसंगत आहेत. त्यामुळे या निर्णयाचा फेरविचार करण्याची गरज नाही.

XXXXXXXXXXXXX

३८.६. वर उल्लेख केले आहे त्यावरून असे म्हणता येईल की "दुकान" म्हणजे व्यवसायाचे ठिकाण किंवा आस्थापना जिथे किरकोळ वस्तू विकल्या जातात. तथापि, हे लक्षात घेतले पाहिजे की शब्दकोशांमध्ये दिलेल्या व्याख्या खूप जुन्या आहेत आणि सध्याच्या काळात "दुकान" म्हणजे काय म्हणता येईल हे पूर्ण अचूकतेने प्रतिबिंबित करू शकत नाही. त्यामुळे या न्यायालयाने आपल्या न्यायालयीन निर्णयांमध्ये 'दुकान' या शब्दाला कशा प्रकारे हाताळले आहे, याचा विचार करणे योग्य ठरेल.

३९. ई एस आय कायद्याच्या संदर्भात "दुकान" या शब्दाची चर्चा या न्यायालयाने यापूर्वीच्या प्रकरणांमध्ये केली आहे. हिंदू जी बँड [हिंदू जी बँड विरुद्ध ई एस आय कॉर्पोरेशन, (१९८७) २ एस सी सी १०१ : ए आय आर १९८७ एस सी ११६६] मध्ये असे दिसून आले आहे की "दुकान" ही अशी जागा असेल जिथे किरकोळ तत्त्वावर सेवा विकल्या जातात. इंटरनॅशनल ओर अँड फर्टिलायझर्स (इंडिया) (प्रायव्हेट) लिमिटेड विरुद्ध ई एस आय कॉर्पोरेशन. [(१९८७) ४ एस सी सी २०३] या खटल्यात या न्यायालयाने म्हटले आहे की "दुकान" ही अशी जागा असेल जिथे वस्तूंच्या खरेदी-विक्रीशी संबंधित कामकाज केले जातात. कोचीन शिपिंग कंपनी [कोचीन शिपिंग कंपनी विरुद्ध ई एस आय कॉर्पोरेशन, (१९९२) ४ एस सी सी २४५] खटल्यामध्ये न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की "दुकान"

ही अशी जागा मानली पाहिजे जिथे मालाच्या खरेदी-विक्रीची व्यावसायिक क्रिया होते. आर.के. स्वामी खटल्यात [ई एस आय कॉर्पोरेशन विरुद्ध आर. के. स्वामी, (१९९४) १ एस सी सी ४४५] न्यायालयाने "दुकान" या शब्दाचा अर्थात वाढ करून सेवांच्या विक्रीचाही त्यात समावेश केला.

४०. त्यामुळे वर उल्लेख केलेल्यामधून 'दुकाना'ची काही मूलभूत वैशिष्ट्ये निवडून घेता येतील. मग असे म्हणता येईल की "दुकान" ही एक व्यावसायिक आस्थापना आहे जिथे वस्तू किंवा सेवांच्या विक्री किंवा खरेदीसंदर्भात पद्धतशीर किंवा संघटित व्यावसायिक उपक्रम केले जातात आणि त्यात वरील व्यवहार सेवा देणाऱ्या आस्थापना देखील समाविष्ट आहे.

४१. 'दुकान' या शब्दाची व्याख्या ई एस आय कायद्यात किंवा अधिसूचनेत केलेली नाही. ई एस आय कायदा हा समाजकल्याण कायदा असल्याने सर्व प्रवर्गातील कामगारांना जास्तीत जास्त फायदा होणे अभिप्रेत आहे, म्हणून अशा कल्याणकारी कायद्यातील शब्दांचा अर्थ लावताना उदार असणे आवश्यक आहे. दुकान म्हणजे घर किंवा इमारत जिथे वस्तू विकल्या जातात किंवा विकत घेतल्या जातात त्या दुकानाच्या व्याख्येत आता मोठा बदल झाला आहे. परिपत्रकात मध्ये येणारा "दुकान" हा शब्द त्याच्या नेहमीच्या अर्थापेक्षा व्यापक अर्थाने वापरला आहे. आता ती जागा 'दुकाना'च्या कक्षेत आणण्यासाठी ती पद्धतशीर आर्थिक

किंवा व्यावसायिक उपक्रम असणे पुरेसे आहे.

४२. 'आस्थापना' हे व्यवसायाचे ठिकाण आणि तसेच 'दुकान' हे व्यवसाय आस्थापना असल्याचे आढळून आले आहे हे लक्षात घेऊन असे म्हणता येईल की "दुकान" खरोखरच "आस्थापना" या शब्दाखाली समाविष्ट आहे आणि त्याला "आस्थापना" या शब्दाचा एक उपसंच म्हटले जाऊ शकते.

८.१.३ त्यानंतर आणि असे निरीक्षण केल्यानंतर, टर्फ क्लब हा, ई एस आय कायद्याच्या उद्देशाने "दुकान" या शब्दाच्या व्याख्येत येतो की नाही याचा विचार या न्यायालयाने केला आणि परिच्छेद ४७ मध्ये असे निरीक्षण केले जे खाली नमूद केले आहे :-

"४७. क्लब सेवा देत नाही, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे नाही. प्रेक्षकांना मनोरंजनाचे साधन उपलब्ध करून देण्याबरोबरच केवळ प्रवेश किंवा प्रवेश शुल्क भरून सर्व जनतेला ही सेवा उपलब्ध आहे, असे म्हणता येईल. त्यामुळे अशा सेवा एखाद्या दुकानाने पुरविलेल्या सेवांप्रमाणेच समजल्या जाऊ शकतात का, हा एकच प्रश्न आहे. याचे उत्तर होकारार्थी असेल, तर असे रेस क्लब "दुकान" या शब्दाच्या व्याख्येत नक्कीच येतील, आणि त्यामुळे ई एस आय कायद्यातही येतील."

८.१.४ वरील निर्णयात ई एस आय कायद्याची योजना व संदर्भ यांचा योग्य

विचार करणे आवश्यक आहे, असे विशेष नमूद केले आहे. ई एस आय कायद्यात वापरल्या गेलेल्या शब्दांना संकुचित अर्थ जोडता कामा नये कारण ई एस आय कायदा या अंतर्गत येणाऱ्या आस्थापनांच्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या जीवन, आरोग्य आणि कल्याणाच्या विविध जोखमींपासून विमा उतरविण्याचा प्रयत्न करतो आणि नियोक्त्यावर उपरोक्त शुल्क टाकतो. "दुकान" हा शब्द त्याच्या पारंपारिक अर्थाने समजू नये आणि त्याचा अर्थ लावू नये कारण यामुळे ई एस आय कायद्याचा हेतू साध्य होणार नाही. पुढे असे निरीक्षण केले आहे की ई एस आय कायद्याच्या हेतूंसाठी "दुकान" या शब्दाला विस्तृत अर्थ देण्यात यावा. पुढे असे निरीक्षण केले आहे की टर्फ क्लबचे उपक्रम संघटित आणि पद्धतशीर व्यवहारांच्या स्वरूपाचे आहेत आणि टर्फ क्लब पैशांच्या बदल्यात सदस्यांना तसेच जनतेला सेवा प्रदान करतात, म्हणून, टर्फ क्लब ई एस आय कायद्यांतर्गत लाभ देण्याच्या हेतूने एक "दुकान" आहेत.

९. **बेंगळुरू टर्फ क्लब लिमिटेड** (सुप्रा) च्या बाबतीत या न्यायालयाने घालून दिलेला कायदा आता समोर असलेल्या प्रकरणातील वस्तुस्थितीवर लागू कुरूप पाहिला असता आणि बी सी सी आय कडून सुरू असलेल्या पद्धतशीर उपक्रमांचा विचार करून पाहिला असता, जसे की क्रिकेट सामन्यांची तिकिटे विकणे; करमणूक पुरविणे; किंमतीसाठी सेवा प्रदान करणे; आंतरराष्ट्रीय दौऱ्यांमधून मिळणारे उत्पन्न आणि इंडियन प्रीमियर लीगमधून मिळणारे उत्पन्न प्राप्त करणे , ई एस आय कोर्ट आणि उच्च

न्यायालयाने योग्यच निष्कर्ष काढला आहे की बी सी सी आय पद्धतशीर आर्थिक व्यावसायिक उपक्रम चालवीत आहे आणि म्हणूनच, ई एस आय कायद्यातील तरतुदी लागू करण्याच्या हेतूने बी सी सी आय "शॉप" आहे असे म्हणता येईल. रेकॉर्डवरील संबंधित पुरावे / सामग्रीचे विश्लेषण केल्यानंतर, ई एस आय कोर्ट आणि उच्च न्यायालयाने असा निष्कर्ष नोंदविला होता की बी सी सी आय पद्धतशीर व्यावसायिक उपक्रमात गुंतलेली आहे आणि नफा कमावणारी संस्था आहे आणि मनोरंजन उद्योगात गुंतलेली आहे कारण ती ग्राहकांना पैसे घेऊन म्हणजे तिकिटे विकून मनोरंजन पुरवते आणि म्हणूनच, त्यांनी पात्र कर्मचाऱ्यांना, देय वेतनावर ई एस आय योगदानाची व्याप्ती लागू करून आपल्या कर्मचाऱ्यांना लाभ देणे आवश्यक आहे. ई एस आय कोर्ट आणि उच्च न्यायालयाने नोंदवलेले निष्कर्ष रेकॉर्डवरील पुरावे / सामग्रीच्या मूल्यांकन केल्यानंतर केले आहेत, ज्यामुळे भारतीय राज्यघटनेच्या कलम १३६ अंतर्गत अधिकारांचा वापर करून या न्यायालयाने हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नाही.

१०. बी सी सी आय च्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, बी सी सी आय चे मुख्य कार्य हे क्रिकेट / खेळांना प्रोत्साहन देणे आहे आणि म्हणूनच, ई एस आय कायदा लागू करण्याच्या उद्देशाने ते "दुकान" च्या व्याख्येत आणले जाऊ नये, आणि उपरोक्त चर्चेत तथ्य नाही. विचारात काय घ्यायला हवे तर एकंदर उपक्रम. याद्वारे निरीक्षण केल्याप्रमाणे चाचणी केल्यास, जर **बंगळुरू टर्फ क्लब लिमिटेड** (सुप्रा) च्या

बाबतीत या न्यायालयाने अवलंब केलेली चाचणी वापरली - तर - तिकिटे विकून करमणूक पुरवणे हे बी सी सी आय कडून केले जाणारे उपक्रम व्यावसायिक उपक्रम म्हणता येतील, . त्यामुळे ई एस आय कायद्याच्या हेतूने बी सी सी आय हे 'दुकान' म्हणता येईल. **बेंगळुरू टर्फ क्लब मर्यादित** (सुप्रा) च्या बाबतीत या न्यायालयाने निरीक्षण आणि निकाल दिल्याप्रमाणे ई एस आय कायदा हा एक कल्याणकारी कायदा असल्याने ई एस आय कायदा लागू करण्याचे उद्दिष्ट आणि हेतू साध्य करण्यासाठी व्यापक अर्थ दिला गेला पाहिजे, म्हणजे कर्मचाऱ्यांना आजारपणाच्या बाबतीत काही लाभ देणे, महिला कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मातृत्व, नोकरी दरम्यान इजा इ.

११. आता, **सचिव माहिती आणि प्रसारण मंत्रालय भारत सरकार आणि इतर विरुद्ध बंगाल क्रिकेट असोसिएशन अँड इतर, (१९९५) २ एस सी सी १६१ आणि विक्रीकर आयुक्त विरुद्ध साई प्रकाशन निधी , (२००२) ४ एस सी सी ५७** या प्रकरणातील निर्णयावर बी सी सी आय च्या वतीने उपस्थित विद्वान वकिलांनी अवलंबून राहून घेतलेला आधार त्याबद्दल विचार करायचा झाला तर, ई एस आय कायद्यातील तरतुदींचा विचार करता आणि/ किंवा ई एस आय कायदा जो एक सामाजिक कल्याणकारी कायदा आहे, त्याच्या अंमलबजावणीचा हेतू पाहता, वरील निर्णय लागू होणार नाहीत आणि/किंवा बी सी सी आय ला कोणतीही मदत होणार नाही. **साई पब्लिकेशन फंड** (सुप्रा)च्या बाबतीत हे न्यायालय आयकर कायद्यातील तरतुदींचा विचार

करत होते. **बंगळुरू टर्फ क्लब लिमिटेड** (सुप्रा) च्या बाबतीत, या न्यायालयाने निरीक्षण केले आणि म्हटले आहे दोन कायदे एकमेका बरोबर पॅरी मटेरिया (pari materia) आहेत असे म्हटले जाते जेव्हा ते एकाच विषयाशी संबंधित असतात. तसेच न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले आहे की, विशिष्ट कायद्यात वापरलेल्या शब्दाचा अर्थ, दुसऱ्या कायद्यात त्याच अर्थाने अनुवाद करून वापरला जाऊ शकत नाही, विशेषत: हे लक्षात घेता की दोन्ही कायदे एकमेकाबरोबर पॅरी मटेरिया नाहीत आणि ते एकमेकांपासून पूर्णपणे वेगळ्या विचारातून बनवले आहेत.

१२. वरील बाबी लक्षात घेता आणि वर नमूद केलेल्या कारणांमुळे, ई एस आय कायदा लागू करण्याच्या उद्देशाने बी सी सी आय ला "दुकान" मानण्यात आणि विचार करण्यात ई एस आय कोर्ट आणि / किंवा उच्च न्यायालयाने कोणतीही चूक केलेली नाही, जो येथे नमूद केल्याप्रमाणे एक सामाजिक आणि कल्याणकारी कायदा आहे. असे करताना उच्च न्यायालयाने बी सी सी आय च्या मेमोरेंडम ऑफ असोसिएशनच्या संबंधित कलमांचाही विचार करून या निष्कर्षापर्यंत पोहोचले आहे की, बी सी सी आय चे उपक्रम म्हणजे तिकिटे वगैरे विकून करमणूक देणारे पद्धतशीर व्यावसायिक उपक्रम म्हणता येतील. एकूण संपूर्ण मेमोरेंडम ऑफ असोसिएशनचा विचार होणे गरजेचे आहे.

१३. वरील बाबी लक्षात घेता आणि वर नमूद केलेली कारणे लक्षात घेता उच्च न्यायालय तसेच ई एस आय न्यायालयाने दिलेल्या निर्णयात आणि आदेशात हस्तक्षेप

करण्याचे आम्हाला कोणतेही कारण दिसत नाही. त्यामुळे उच्च न्यायालयाने घेतलेल्या मताशी आम्ही पूर्णपणे सहमत आहोत. त्यानुसार विशेष अनुमती याचिका फेटाळल्या जात आहेत.

त्याबरोबर प्रलंबित अर्ज असल्यास त्याचाही निपटारा केला जात आहे.

दिव्या पांडे एस एल पी संपुष्ठात आल्या.

*****

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

*****